# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## आविष्कार स्पर्धेसाठी नियम व अटी

१. शिवाजी विद्यापीठांतर्गत येणारी सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व अधिविभागांना या संशोधन स्पर्धेत सहभागी होणे बंधनकारक आहे.

२. सर्व स्पर्धेसाठी संशोधन लेख (Research Paper) आणि पोस्टर्स सादर करणे आवश्यक आहे. तसेच शक्य असेल त्या ठिकाणी पी.पी.टी. व मॉडेल्स सादर करावेत.

३. सहभागाचे पुढीलप्रमाणे तीन स्तर आहेत:

- i. पदवी (UG)
- ii. पदव्युत्तर (PG)
- iii. एम.फिल./पीएच. डी. साठी प्रवेशित असणारे विद्यार्थी (PPG)

४. कोणत्याही शाखेमध्ये शिकत असलेला कोणताही विद्यार्थी खालील कोणत्याही शाखेअंतर्गत भाग घेवू शकतो.

- i. Humanities, Languages, Fine Arts,
- ii. Commerce, Management, Law,
- iii. Pure Sciences,
- iv. Agriculture and Animal Husbandry,
- v. Engineering and Technology
- vi. Medicine and Pharmacy.

५. जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये शाखा निहाय प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवा क्रमांक प्राप्त स्पर्धकांना खालीलप्रमाणे रोख परितोषिके बक्षीस स्वरुपात द्यावयाची आहेत.

- प्रथम — रु. १,०००/—
- द्वितीय — रु. ७००/—
- तृतीय — रु. ५००/—
- चतुर्थ — रु. ५००/—
- पाचवा — रु. ५००/—

६. सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.

७. सहभागी विद्यार्थ्यांसोबत दोन संघव्यवस्थापक असावेत. (एक पुरुष व एक स्त्री)

८. सदर प्रदर्शनास आवश्यक असणाऱ्या सर्व तांत्रिक सुविधांची (LCD, Screen, etc.) पूर्तता यजमान महाविद्यालयांनी/अधिविभागांनी करावयाची आहे.

९. प्रदर्शनातील संशोधन प्रकल्प, पोस्टर्स, इत्यादी बाबींचे परिक्षण नियुक्त तज्ञांकडून केले जाईल व परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१०. पोस्टर्सची साईज १ मी. X १ मी. असणे बंधनकारक आहे. पोस्टर वर स्पर्धकाचे अगर कॉलेजचे नाव लिहू नये तसेच ओळख स्पष्ट करणारी कोणतीही खून/चिन्ह नसावी. अन्यथा संबंधीत स्पर्धकाचा सहभाग रद्द करण्यात येईल.

११. स्पर्धेच्या दिवशी संबंधीत प्रदर्शनातील स्पर्धकांनी प्रकल्प मांडणी सकाळी १०.०० वाजेपर्यंत करणे आवश्यक आहे.

१२. स्पर्धकांनी आपले वा संबंधीत महाविद्यालयाची तोंडी अथवा लेखी ओळख स्पष्ट होईल असे कोणतेही वर्तन करु नये अन्यथा त्यांचा प्रदर्शनातील सहभाग रद्द करण्यात येईल.

१३. प्रवेशिका, संशोधन निबंध, सी.डी. आणि पोस्टर्स इत्यादी महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत/अधिप्रमुखांमार्फत यजमान महाविद्यालयाकडे/अधिविभागाकडे पाठविण्यात यावी.

१४. प्रत्येक महाविद्यालयाकडून वरील सहा शाखांकरिता खाली नमुद केले प्रमाणे पदवी (UG) स्तरावरील, पदव्युत्तर (PG), पदव्युत्तर पदवी (PPG) स्तरावरील खाली नमुद केलेप्रमाणे स्पर्धक विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत सहभागी होवू शकतात. **प्रत्येक स्पर्धा प्रकारासाठी एक पोस्टर/मॉडेल ला एकच विद्यार्थी सहभागी होऊ शकतो.**

| Level of Participation | Max no. of participants to be allowed for level 2 Short listing | |
|---|---|---|
| | Institutions having students-strength up to 2999 | Institutions having students-strength 3000 and above |
| UG | 12 | 18 |
| PG | 12 | 18 |
| PPG | 06 | 06 |

१५. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याची महाविद्यालयाने खालीलप्रमाणे कागदपत्रे नोंदणीवेळी जमा करणे आवश्यक आहे.

अ. सहभागी विद्यार्थ्यांचे ओळखपत्र
ब. चालू वर्षातील प्रवेश पावती
क. दहावी बोर्ड प्रमाणपत्र / जन्मदाखला
ड. गतवर्षीच्या निकालाची प्रत

१६. संबंधीत विद्यार्थ्यांने केलेले संशोधन व्यक्तीगत स्वरूपाचे असावे व ते प्राचार्य किंवा मार्गदर्शक यांपैकी एकाने सांक्षाकित केलेले असावे.

१७. प्रवेश घेतेवेळी प्रवेशिका म्हणून स्पर्धकास आपले शोधनिबंध व Poster Presentation आवश्यक असून प्रकल्प सी. डी., Powerpoint Presentation & Model इत्यादी स्वरूपात स्पर्धेत भाग घेता येईल. सर्व संबंधीत सहभागी विद्यार्थ्यांनी पोस्टर करणे बंधनकारक आहे.

१८. शोधनिबंध हा प्रात्यक्षिक, लेखी, नमुना सादरीकरण, तोंडी किंवा पोस्टर्सच्या माध्यमातून प्रदर्शित करावा.

१९. स्पर्धकाला Electric Point ची आवश्यक असेल तर त्यांनी तसा उल्लेख नोंदणी अर्जामध्ये करणे गरजेचे आहे.

२०. विद्यार्थ्यांचा व संघव्यवस्थापक यांचा प्रवास खर्च संबंधीत महाविद्यालयाने करावयाचा आहे. यजमान महाविद्यालयाने करावायचा नाही.

२१. प्रत्येक जिल्हयामधुन पदवीस्तरातील १ ते ५ क्रमांकाचे विजेते विद्यापीठ स्तरांवरील स्पर्धेत सहभागी होतील.

२२.विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेतील प्रत्येक विभागातील १ ते ५ क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठामध्ये पुन्हा स्वतत्रपणे निवड चाचणी घेण्यात येईल व त्यामधुन UG व PG लेवल मधील तीन सर्वोत्कृष्ट स्पर्धक व PPG लेवल मधील दोन सर्वोत्कृष्ट स्पर्धक राज्यस्तरावर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील.

२३.सर्वांत जास्त क्रमांक प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयास/अधिविभागास सर्वसाधारण विजेते पदाचा फिरता चषक देण्यात येईल.

२४.पदवीस्तरावरील स्पर्धकांनी आप–आपल्या जिल्हयांमध्येच भाग घेणे आवश्यक आहे. इतर जिल्ह्यांमध्ये भाग घेता येणार नाही.

२५.युजी, पीजी व पीपीजी विद्यार्थ्यांची पात्रता सोबत जोडल्याप्रमाणे आहे.

संचालक
विद्यार्थी विकास